निशाणी क्र.८२ खाली.

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.२ प्रकाश मुरलीधर काकडे यांचा शपथेवर पुढील उलटतपास विधीज्ञ श्री. एन. बी. सांगळे यांचेतर्फे सुरु...</u>**

१३. गट क्र.२४८ चे एकुण क्षेत्रफळ माझ्या लक्षात नाही. गट क्र.२४८ मध्ये मी, माझा भाऊ, ३ बहिणी आणि आई यांची शेती आहे. गट क्र.२४८ ही शेती वडीलोपार्जीत नाही. साक्षीदार सांगतो की, ती माझ्या वडीलांची शेती आहे. माझ्या वडीलांनी ती शेती विकत घेतली होती. मला माझ्या वडीलांनी शेती कोणाकडून विकत घेतली होती ते माहित नाही.

प्रश्न– तुमच्या वडीलांची शेती तुमच्याकडे मृत्युपत्राने आली की वाटणीने आली ?
उत्तर– मृत्युपत्राने आली.

१४. माणीकराव परशराम नवघरे हे आज माझ्यासोबत आले आहे आणि ते कोर्ट हॉलमध्ये बसले आहे. प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी माणीकराव नवघरे यांचा पुरावा देउ शकतो या कारणामुळे त्यांना कोर्ट हॉलच्या बाहेर बसायला सांगितले. गट क्र.२४८ च्या पुर्वेला कोणाचा व कोणता गट क्रमांक आहे हे मला लक्षात नाही. नवघरे मामाचा (प्रतिवादी क्र.७) गट क्रमांक सुर्य मावळतो त्या दिशेने आहे. नवघरे मामा हे शेतीचे काम करतात. हे मला माहित नाही की नवघरे मामा राजकारणी आहे. माझ्या जमिनीचा सर्वे क्रमांक आणि नवघरे मामाच्या जमिनीचा सर्वे क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीचा सर्वे क्रमांक आणि नवघरे मामाच्या जमिनीचा सर्वे क्रमांक हे वेगवेगळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीच्या व नवघरे मामाच्या जमिनीच्या मधात उत्तर–दक्षिण धुरा आहे. साक्षीदार सांगतो की, त्यांच्या दोघांच्या जमिनीच्या मधात नाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमिनीच्या व नवघरे मामाच्या जमिनीच्या मध्ये मातीचा बांध घातलेला आहे. थार बरदापुर ते कासारखेड सडक रस्ता ही प्रतिवादी क्र.७ च्या जमिनीला लागुन गेली आहे. हे म्हणणे

खरे आहे की, नवघरे मामाच्या जमीनीला उत्तरेकडून धुरा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो धुरा पश्चिमेकडून पुर्वेकडे जातो. साक्षीदार सांगतो की, माझी जमीन सुध्दा कासारखेड सडकेला लागुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, कासारखेड सडकेपासुन गट क्र.२४८ व २३३ च्या मधातील उत्तर–दक्षिण चालीच्या धुऱ्याने वादीचा गट क्र.२४७ मध्ये त्यांच्या जमिनीत जाण्यासाठी वहिवाटी शेतरस्ता होता.

*प्रतिवादींच्या वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.*

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by TRIVENI SURESHRAO GAIGOLE
Date: 2025.09.20 17:35:56 +0530

दिनांक : २०/०९/२०२५

**(श्रीमती टि. एस. गायगोले)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मेहकर.